# पोलीस आयुक्तालय अमरावती शहर

## दैनंदिन गुन्हे - दिनांक १०/०९/२०२३

### दुखापतः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर अप क्र ३९७/२०२३ कलम ३२४,२९४,५०४,५०६ भादवी | राहते घरी जोडमोड औरगपुरा हनुमान मंदिर जवळ अमरावती | गुन्हा घ ता वेळ - दि ०९/०९/२०२३ चे सकाळी ०९/३० वा गुन्हा दा ता वेळ- दि ०९/०९/२०२३ चे १२.४३ वा | रामलाल परसराम रवतीया वय ६० वर्ष रा जोडमोड औरंगपुरा हनुमान मंदीर जवळ अमरावती ह मु वरोरा रेल्वेस्टेशन जवळ मालविय वॉर्ड वरोरा चंद्रपुर | पवन वसंत रवतीया वय २५ वर्ष रा ाेडमोड औरंगपुरा हनुमान मंदीर जवळ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद फिर्यादी हे त्यांचे आई सोबत बोलत असतांना आरोपी याने तु आजी सोबत का बोलत आहे असे म्हणुन काहीही कारण नसतांना शिवीगाळ केली फिर्यादीने मला शिवीगाळ का करतआहे असे म्हटले असता आरोपी याने एक ॲल्युमिनीयम ची पॅनल पटटी काढुन फिर्यादीचे अंगावर मारायला आला फिर्यादीने सदर पटटी डाव्या हाताने पकडली असता आरोपीने सदर पटटी ओढुन घेवुन फिर्यादीचे हाताला जखम केली व पाहुन घेण्याची धमकी दिली फिर्यादीचे हातातुन रक्त वाहत होते अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल. |

### विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती अप क्र, ७३५/२०२३ कलम ३५४ ड ,५०४,५०६ भादवी सहकलम १२ पोक्सो | पो.स्टे. फ्रेजरपुरा हद्दीत अमरावती | घ.ता.वेळ दि.६/९/२०२३ चे १६.३० वा<br><br>दाखल ता वेळ दि.९/९/२०२३ चे ००.५३ | एक महिला | फि. चे ओळखीचा इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी व आरोपी हे मे २०२३ पासुन एकमेकासोबत बोलत नसल्यामुळे आरोपीने फिर्यादीस म्हटले की तुझ ाा फेक व्हिडीओ वायरल करीत अशी धमकी देवुन शिवीगाळ केली फिर्यादी हिने बोलने टाळले असता आरोपीने फि चा जात असतांना पाठलाग केला नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपीने व्हॉट्अप द्वारे फिर्यादीस बोलावुन मला थोडे पैसे दे असे म्हटले असता फिर्यादी हिने नकार दिला तर आरोपी याने भांडण करने सुरू केले दि.८/९/२०२३ रोजी पुन्हा भेटायला बोलावले असता फिर्यादीच्या दीदीला फिर्यादी व आरोपी हे दिसले असता फिर्या-दीने बहीणीला व आई वडीलांना सांगुन पोस्टेला रिपोर्ट देण्यास सांगितला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क् ४५७/२३ कलम ३५४ (क) भादवी | पो.स्टे. नागपूरी गेट हद्दीत अमरावती | घ . ता वेऴ दि. दि. ०५/०९/२०२३ चे सकाळी ०९/३० वा दाखल ता. वेऴ- दि. ०९/०९/२०२३ चे १६/२५ वा | एक महिला | शाहरुख अब्दुल मजिद रा. आमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी तिचे घराचे बांधरुम मध्ये अंघोळ करत असतांना यातील नमुद आरोपीने फिर्यादीचा अंघोळ करतांनाचा व्हीडीओ फिर्यादीचे लपुन काढला फि. ला तसे लक्षात आले असता तिने बाहेर येवुन सदर बाबत तिच्या आईला सांगीतले असता तिचे आईने बाहेरजावुन पाहीले तर नमुद आरोपी हा तेथे बसलेला दिसुन आला वरुन फिर्यादीचे वडील आल्यानंतर फिर्यादी व तिचे आईने सदर हकीकत फि. चे वडीलांना सांगीतली वरुन आज रोजी रिपोर्ट देण्यास आले नमुद आरोपी याने फि. चा लपुन अंघोळ करते वेळीचा व्हीडीओ बनवुन फिर्यादीस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर अप क्र ३९८/२०२३ | पो.स्टे. सिटी कोतवाली, अमरावती | गुन्हा घ ता वेळ - दि ०९/०९/२०२३ चे सकाळी ११/२० वा | एक महिला | विशाल रविंद्र कंठाले वय २८ वर्ष रा लिलाबाई | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद फिर्यादी ही पायरी चढत असतांना फिर्यादीचे समोरुन एक अनोळखी मुलगा पाय-या खाली उतरत असतांना तो फि. चे जवळ आला व त्याने अचानक फि. चे ड्रेस वरुन अंगाला हात मारुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला फि. ही घाबरली व जोरजोराने ओरडली असता त्या ठिकाणी असलेले व्यक्ती आले व त्या अनोळखी इसमाला पकडले असता त्याने त्याचे नाव विशाल रविंद्र |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम ३५४,३५४(अ) भादवी | | गुन्हा दा ता वेळ- दि ०९/०९/२०२३ चे १४.२२ वा | | किराणा शॉप जवळ आदर्श नगर, गोपाल नगर परीसराजवळ अमरावती | कंठाले वय २८ वर्ष रा लिलाबाई किराणा शॉप जवळ आदर्श नगर, गोपाल नगर परीसराजवळ अमरावती असे सांगीतले त्याला लोकांनी पोलीस स्टेशनला आणले तरी सदर कृत्यामुळे फि च्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न झाली व सदर आरोपीने फि चा विनयभंग करुन पळुन जाण्याचा प्रयत्न केला सदर आरोपी विरुदध कायदेशी कार्यवाही व्हावी करीता रिपार्ट देत आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल. |

## आत्महत्तेस प्रवृत्त:-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे राजापेठ अप क्र. ८२९/२३ कलम ३०६ भादवी | रंगोली हॉटेलच्या मागील रेल्वे ट्रॅक अमरावती | दि. ९/९/२३ चे ०७/०० वा. ते १०/०० वा दरम्यान<br><br>दा. ता. वेळ - दि. ९/९/२३ चे २२/२३ वा. | मृतकचे वडील | गौरव मोरेश्वर हरणखेडे वय- २८ रा.- रामेश्वर मंदीर जवळ अमरावती | हकीकत ्शा प्रकारे आहे की फी. यांची मुलगी फी. तसेच त्याचे लहान भाऊ यांना वारंवार सांगीतले होते की,ती कॉलेज मध्ये जातांना कोणीतरी मुलगा तीला त्रास देत आहे, दि. ०८/०९/२३ रोजी फी. घरी हजर ्असतांना त्यांना त्यांची मुलगा टेंशन मध्ये दिसली फी, ने त्यांचे मुलीस विचारले असता तीने सांगीतले की, आरोपी हरणखेडे हा तीला त्रास देत आहे , वारंवार कॉल करत आहे, कॉलेट, ट्युशन व घरा कडे चक्कर मारत आहे.मी त्याला समजावुन सांगीतले तरी तो ऐकत नसल्याने नमुद घ.ता.वेळी व ठाकाणी फी.च्या मुलीने आरोपीच्या त्रासाला कंटाळुन तीला आत्महत्या करणेस प्रवृत्त केल्याने फी.च्या मुलीने धावत्या रेल्वे खाली जिव देवुन आत्महत्या केलेली आहे, अशा फी चे जबाणी रिपो्रट वरुन पो. स्टे. ला सदरचा गुन्हा दाखल . |

## वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा ७३६/२०२३ कलम ३७९भादवी | सबनीस प्लाट कल्यान नगर अमरावती | दि, ०८/०९/२०२३ चे ०२.०५ वा दि.०९/०९/२०२३ चे १७.५६ वा | तुषार विद्याधर गणविर वय३७ वर्ष व्यवसाय -ड्रायवर ,रा सबनीस प्लॉट कल्यान नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी जवळ स्पेलंडर प्लस क्र,एम एच २७ सी जी ३०६८ ब्लक रंगाची ब्लु पट्टा असलेली गाडी तो स्वता वापरतो दि.८/९/२०२३ दुपारी ०२.०५वाजता दरम्यान फिर्यादीचा मित्र सागर अघम याला बस स्टॅन्ड अमरावती येथे सोडुन घराजवळील गेट समोर स्प्लेन्डर प्लस क्र, ,एम एच २७ सी जी ३०६८ गाडी उभी करुन घरात गेलो असता संध्याकाळी ०७.०० वा. दरम्यान घराच्या बाहेर आल्ो असता घराच्यागेट समोर splender +गाडी क्र,एम एच २७ सी जी ३०६८ गाडी दिसुन आले नाही.आजुबाजुला व पत्नीला वीचारपुस करुन गाडीचा भरपुर शोध घेतला . पंरतु ती मिळुन आली नाही . splender+गाडी क्र,एम एच २७ सी जी ३०६८हिचा चेचीस क्र. MBLHAR085JHB74971 इंजीन क्र. HA10AGJHB27478 असा असुन किंमत अंदाजे जुनी वापरती ३०.०००/-रुपये असलेली कोनीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे त्यामुळे रिपोर्ट देण्याकरीता आलो आहे . हाच माझा जबानी रिपोर्ट असुन माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केला वाचुन दाखविला बरोबर आहे अश्या फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल . |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो स्टे गाडगे नगर अम.<br>अप क्र १११०/२०२३<br>कलम<br>३७९ भादवी | राधा नगर गल्ली नं १ समोरील उडडाण पुलाखाली अमरावती | ०२.०९.२०२३ चे ०९.००<br><br>०९.०९.२०२३ चे १७.४२ वा | हेमंत कन्हैय्याला रेडडी वय २३ वर्ष रा राधा नगर गल्ली नं १ घोंगडे किराणा समोर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील घतावेळी आपली गाडी स्प्लेंडर हीरो होंड कंपनीची गाडी क्रमांक एम एच २७ एन ५१७९ चेचीस नं ०१एल २० सी२१७१ इंजीन नंबर ०१L१८M५७६४ काळया रंगाची शेंदरी असलेली समोरील लाईटचे वर वरद नाव लिहीले किंमत २०,०००/- रुपये अशा वर्णनाची गाडी घटनास्थळी लागून फीर्यादी झेरॉक्स काढण्याकरीता गेले व झेरॉक्स काढून गाडी लावलेल्या ठीकाणी परत आले असता त्या ठीकाणी गाडी मिळून आली नाही. गाडी कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अशा फीर्यादीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र. ८२७/२३कलम ३७९ भादवी | रुख्मीनी नगर अमरावती | दि. ८/९/२३ चे ०१.०० ते ०२.१५ वा. दरम्यान<br>दा. ता. वेळ - दि. ९/९/२३ चे ०७.३४ वा. | शुभम प्रमोदराव टापरे वय २८ रा गगलानी नगर अमरावती | अज्ञात | हकीकत ्शा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ने त्यांची दुचाकी मोटर सायकल ही ढोले हॉस्पीटल समोर उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने सदर मोटर सायकल क्र एमएच ४०यु १८९९ क ४०,००० रु ची चोरुन नेले अशा फी चे जबाणी रिपो्रट वरुन पो. स्टे. ला सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | पोस्टे राजापेठ अप क्र. ८२८/२३<br>कलम ३७९ भादवी | स्वास्तीक नगर अमरावती | दि. ५/९/२३ चे १६.२२ वा. दरम्यान<br>दा. ता. वेळ - दि. ९/९/२३ चे १६.३६ वा. | महेश सुरेश लढ्ढा वय ४४ रा.- स्वस्तीक नगर अमरावती | अज्ञात | हकीकत ्शा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याचे मुलाने त्याचे राहते घराचे अंगनात ठेवलेली हीरो होल्पर कंपनीचा सायकल की. अं. ७,०००० रु. कोणातरी अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फी चे जबाणी रिपो्रट वरुन पो. स्टे. ला सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी :- ०१

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | पोस्टे खोगेट अप. न.<br>190/2023 कलम 379 भादवि | लोणटेक सिवार | दि. 09.09.2023 चे 10.00 वा<br>दाखल - दि. 09.09.2023 चे 13.01 | योगेश क्रुष्णराव बारलिंगे वय 52 वर्, रा शारदा विहार रविनगर अमरावती | अज्ञात | हकीकत- असा प्रकारे आहे की, फिर्यादीचे शेतावर भिमराव चतुराजी धंदर हा चौकीदार असुन नमुद घटना ता वेळी व ठिकाणी चौकीदार यांनी फिर्यादीला फोन करुन सांगीतले की तुमच्या शेतातुन तिन लोखंडी ॅअँगल कि 900 रु व तिन स्पिंकलर कि 900/- रु असा एकुन 1800/-रुचा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे फि चे जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | नांदगावपेठ<br>अप क्र.३५६/२०२३ कलम ४५४,४५७,३८० भादवी | आप्पा विहार सात बंगला रहाटगाव अमरावती | दि. २२/०८/२०२३ चे १९.०० वा. पासुन ते दि. ०९/०९/२०२३ चे १४.०० वा<br>दि. ०९/०९/२०२३ चे २१.३८ वा. | निलेश केशवराव सोळंके वय ३६ वर्षे रा. आप्पा विहार सात बंगला , रहाटगाव अमरावती | अज्ञात | हकिकत अशाप्रकारे आहे की यातील नमुद घ.ता. वेळी. व ठिकाणी फिर्यादी हे दि. २२/०८/२०२३ रोजी १९.०० वा. दरम्याण घराला कुलुप लावुन वरुड येथे गावी कामानिमीत्त परिवारासह गेले होते. दि. ०९/०९/२०२३ चे १४.०० वा दरम्याण फि. हे घरी परत आले असता घराचे मेन दरवाजाचे कुलुप तोडलेले दिसुन आले तसेच आत जावुन पाहिले असता घरातील सामान अस्तव्यस्त दिसत होते घरातील लोखंडी आलमारी चेक केली असता आलमारीचे ड्राव्हर मध्ये ठेवलेले सोने चांदिचे दागीने पाहीले असता दिसुन आले नाही सोन्या चांदीचे दागीण्याचे वर्णन हे खालीलप्रमाणे<br>१) सोन्याचा गोफ १० ग्रॅम कि. ६५,०००/रु २) सोन्याचे मंगळसुत्र ८ ग्रॅम कि.अं. ४०,०००/-रु ३) सोन्याचे लॉकेट २ ग्रॅम कि.अं. १३०००/-रु ४)सोन्याचे कानातले २ ग्रॅम कि.अं. १३,०००/-रु ५) सोन्याची नथ ३०००/ रु ६)चांदिचा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | गणपती कि.अं.४०००/ रु ७)चांदिची चेन कि.अं. ३०००/ रु ८)चांदिच्या तोरडया २ जोड कि.अं. ५०००/रु. ९)चांदिचे कडे ३ नग कि.अं. ३०००/ रु. असा एकुन १,४२,०००/रु चा माल अज्ञात चोराने मेन दरवाजाचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करुन चोरुन नेला. अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **अपघात :-**

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अप क्र १११२/२०२३ कलम २७९,३३७ भादवी | कठोरा नाका | ०९.०९.२०२३ चे १७.०० वा<br><br>०९.०९.२०२३ चे २१.५६ वा | एक महिला | टु व्हीलर नं एम एच २७ डी डी ४८०७ चा बाईक चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फीर्यादी त्याची मालकीची मोपेड नी घटनास्थळ वरुन जात असता पाठीमागून येणारी बाईक क्र एम एच २७ डी डी ४८०७ चे चालकाने फीर्यादीस ठोस मारुन अपघात केला. फी ही खाली पडली असता ठोस मारणारा बाईक स्वार निघून गेला फीर्यादीचे कमरेला मार लागला अशा फीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **ईतर :-**

| अ.क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अप क्र.११११/२०२३ कलम ३४१,२८५ भादवी सहकलम १३५,३३ (v ) मपोका | जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती | दि. ०९.०९.२०२३ चे ११.४५ ते १२.४५ वा<br><br>दातावेळ ०९.०९.२०२३ चे २१.०६ वा | सहा. पो उपनि विजय ढोके ब न १२७१ पो स्टे गाडगे नगर अमरावती शहर | १. श्री संतोष महात्मे , २. श्री उमेश घुरडे , ३. श्री प्रकाश बोबडे , ४. श्री जानराव कोकटे,५.श्री मंगेश शिंदे, ६. डॉ मेघशाम करडे.७.श्री गुणवंत कोकटे , ८. श्री देवराव शिंदे , ९. श्री भोजराज मोरे , १०. श्री प्रकाश मदने ,११. श्री रामकृष्ण गावनेर सर्व रा अमरावती अंदाजे ४० कार्यकर्ते | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठीकाणी यातील संस्थापक अध्यक्ष मेंढपाळ धनगर विकास महाराष्ट्र अध्यक्ष १. संतोष महात्मे व १० कार्यकर्ते अधिक सोबत अंदाजे ४० कार्यकर्ते यांनी काही बॅनरवर मा०.ना श्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे फळक हातात घेतले व त्यावर राधाकृष्ण विखे पाटील यांचे समर्थकांनी व अंगरक्षक यांनी धनगर समाजाच्या कार्यकर्त्यावर केलेले हल्याच्या निषेधार्थ असे लिहीलेले बॅनर घेवून नं. १ सतोष महात्मे यांचे नेतृत्वात रस्त्याच्या मधात येवून येणा-या जाण-या वाहतुकीला अडवून मुर्दाबाद मुर्दाबाद विखे पाटील मुर्दाबाद व हया विखे पाटलाचे करायचे काय खाली मुंडके वरती पाय अशा घोषणा देत रोडच्या मधोमध मोटर सायकल वाहनाचा टायर व बॅनर निषेध व्यक्त करुन जाळले व कार्यकर्ते रस्त्याचे उभे राहून तिव्रपणे निदर्शने करीत असल्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्था बाधीत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

**अकस्मात मृत्यु :-**

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पो स्टे गाडगे नगर मर्ग क्र ५५/२०२३ चे १७४ जाफौ | वार्ड क्र १६-१७ चे बाजुला पी डी एम सी हॉस्पीटल अमरावती<br>घतावेळ<br>०९.०९.२०२३ चे १६.०० वा<br>दातावेळ<br>०९.०९.२०२३ चे २०.३७ वा | पुरुष वय अंदाजे ७० वर्ष | प्रदीप माणिकराव खरबडे वय ३५ वर्ष रा. पी डी एम सी दवाखाना अमरावती | समजून आले नाही | नक्कल जबानी रीपोर्ट पो स्टे गाडगे नगर अम दि ०९.०९.२०२३ प्रदीप मानिकराम खरवाडे वय ५५ वर्ष रा निर्मल शाळेजवळ अमरावती मो क्र ९४०५९७५२७९ पो स्टे ला येवून जबानी रीपोर्ट देते की, वर दिलेल्या पत्यावर परीवारासह राहतो व पी डी एम सी दवाखान्यात सोशल वर्कचे काम करतो. आज दि.०९.०९.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा चे दरम्यान मी पी डी एम सी दवाखान्यात हजर असताना मला तेथील रुग्णाच्या नातेवाईकांनी माहीती दिली की, की एक इसम वार्ड क्र १६-१७ चे बाजुला पडलेला आहे. तेव्हा मी डॉ खंडेवाल सी एम ओ पी डी एम सी यांना घेवून सदर इसमाजवळ गेले असता डॉ खंडेलवाल यांनी सदर पुरुष इसम हा भरण पावल्याचे सांगितले.संपुर्ण दवाखान्यात मृत इसमाबददल चौकशी केली असता सदर पुरुषांचे नाव वय पत्ता नातेवाईक याचा शोध लागला नाही. करीता रीपोर्ट देत आहे हाच माझा जबानी रीपोर्ट आहे सांगतो. प्रमाणे लिहीली वाचून पाहीली बरोबर आहे. सही इंग्रजीत स्पष्ट |
| २ | पोस्टे राजापेठ मर्ग क्र. 57/23 कलम १७४ जा.फौ. | दि. ०९/०९/२३ चे ०७/०० वी. ते. १०/०० वी. | एक महिला | मृतकचे वडील | चालत्या रेल्वेचे खाली जिव देवुन | आम्ही सपोनी झामरे दिवसपाळी अधीकारी म्हणुन ड्युटीवर असतांना पोस्टेचे फोनवर अत्ज्ञात व्यक्तीने माहीती दिली का, रंगोली पर्ल हॉटेलचे मागे रेल्वे ट्रॅकवर एक मुलगी जखमी होवुन पडलेला आहे तीला रीम्स हॉस्पीटल येथे घेवुन गेले आहेत त्या नंतर परत माहीती मीळाली की, रेल्वे ट्रॅकवर एपघात झालेल्या मुलीला ईर्वीन येथे नेले ाहे,त्या वरुन आम्ही ईर्वीन जील्हा सामान्य रुग्णालय अम. येथे गेलो असता मुलीला ईर्वीन दवाखाण्यात तेव्हाच आनण्यात आले होते आम्ही ऍडमाट केले असता डॉ.सा. यांनी तपासले असता मुलगी मृत झाल्याचे डॉ.सा. यांनी लेखी रिपोर्ट दिला वरुन मुलीचे नातेवाईकाना अगोदरच माहीती देण्यात आलेली होती नातेवाईक ईर्वीनला पोहचल्या नंतर प्रेत पोस्टमार्टम करीता मर्च्युरी येथे पाठवीण्यात आले प्रेताचा इंक्वेसंट पंचनामा कार्यवाही करुन प्रेत पोस्टमोर्टम साठी नापोका निवृत्ती भांगे यांच्या ताब्यात देण्यात आले वैद्यकीय अधीकारी यांनी पोस्टमार्टम करुन झाल्या नंतर प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले पोस्टेला येवुन तिचे वडील यांच्या रिपोर्ट वरुन सदरचामर्ग दाखल करण्यात आला. |

**प्रोव्हिशन :-**

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा | अप क्र ७३७/२३कलम ६५ ई मदाका | आरोपीचे रहाते घरासमोर महादेवखोरी बागडे ले आउट अमरावती | दि ९०.०९.२३ चे १७.५० | दि ०९.०९२३चे २०.२६वा | पो हवा सुनील सोळंके बं न २८९पोस्टे फ्रेजरपुरा | प्मोहन सहदेव रामटेके वय ५२ रा महादेवखोरी बागळे लेआउट अमरावती | हकीकत अशाप्राकरे आहे की यातीलनमुद घटनातावेळी व ठिकामी यातील फिर्यादी पोस्टाफ सह पेट्रोलिंग करीत असता मिळालेल्या माहितीगोपनिय माहिती वरून घटनास्थळी जावुन पाहणी केली असता आरोपी हा एक ापिशवीमधुन देशादारू लोकांना विक्री करतांना दिसुन आला त्याच्या वर प्रेव्ही रेड केली असता सदर आरोपी जागीच मिळुन आला त्याचेडुन जप्ती पंचनामाप्रमाणे एकुण १३ नग १८०एम एल चे देशी दारू बॉबी संत्रा च्या पावट्या कि ९१० रू चा प्रेव्ही माल मुद्देमाल मिळुन आल्याने सर गुन्हा दाखल |

जुगार :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पो. स्टे खोलापुरी गेट | अप.न. 191/2023 कलम 12 (अ) म.जु.का | सेळंकी व्हिडीओ गेम पार्लर समोर जवाहर गेट अमरावती | दिनांक 09.09.2023 चे 14.40 वा | दाखल दिनांक 09.09.2023 चे 19.08 वा | सर तर्फे पो हे कॉ जावेद अहेमद ब. नं 1022 गुन्हे शाखा अमरावती | अब्दुल अनिस अब्दुल रशिद वय 55 वर्ष रा हैदरपुरा इदगाह फाटका जवळ अमरावती नाही समज पत्रावर रिहा | हकीकत ्शा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व सोबत पंच व पो स्टॉफ असे पेट्रोलींग करीत असतांना नमुद घटना ता वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदारा व्दारे खात्रीलायक बातमी मिळाल्या वरुन रेड केली असता यातील आरोपी नामे अब्दुल अनिस अब्दुल रशिद वय 55 वर्ष रा. हैदरपुरा इदगाह जवळ अमरावती हा 1 ते 10 आकडे लिहीलेल्या वरली मटक्याच्या चिठ्ठ्या लोकांना देवुन त्यांच्या जवळुन पैसे घेवुन वरली मटक्याचा जुगार चालवित होता. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेवुन त्याच्या ताब्यातुन1) वरली मटका जुगाराचे नगदी 3280/- रु , 2) एक बॉल पेन कि. 10/- रु , 3) 1 ते 10 वरली मटक्याचे आकडे विहीलेल्या पाच चिठ्या असा एकुण 3290/- रु चा माल मिळुन आल्याने पंचानामा प्रमाणे जप्त करण्यात आले व फिर्यादी चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |